महाराष्ट्र शासन - सार्वजनिक आरोग्य विभाग
राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय,
डॉ. नायडू सांसर्गिक रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे -४११ ००१

डॉ.मधुकर शि.पवार
उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजिआ)
तथा उपमुख्य निबंधक
(जन्म व मृत्य) महाराष्ट्र राज्य

कार्यालय :- ०२० - २६०५९५३०
मा.सं. विभाग :- ०२० - २६०५८६१०
फॅक्स क्र. :- ०२० - २६०५८२९२
ई-मेल crs_d83@yahoo.com

**परिपत्रक क्रं.६**

जा.क्र.आमाजिआ/कक्ष-८ ३/मार्गदर्शन/२६०२-२७४/१५
दिनांक:- १३/५/२०१५

प्रति,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक जन्म-मृत्यु
जिल्हा परिषद ........... (सर्व)

२) आरोग्य अधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यु
महानगरपालिका ............ (सर्व)

३) कार्यकारी आरोग्य अधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यु,
बृहन्मुंबई महानगरपालिका, परेल, मुंबई.

४) कार्यकारी अधिकारी तथा निबंधक, जन्म-मृत्यु,
कॅन्टोनमेंट बोर्ड............ (सर्व)

विषय :- जन्म-मृत्यू घटनांची नोंदणी व प्रमाणपत्र वाटपाबाबत अनियमितता व भ्रष्ट कार्यप्रणाली बाबत.

संदर्भ :- १) उपमहानिबंधक (सीआरएस) भारताचे महानिबंधक कार्यालय, नवी-दिल्ली यांचे इंग्रजी पत्र दिनांक २५/०३/२०१५
२) क्रं.संआसे/नानोप/कक्ष-१८/३२६३-६४/२०१५, दिनांक २३/०४/२०१५.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भ क्रं.१ अन्वये भारताचे महानिबंधक कार्यालय, नवी-दिल्ली व त्या अनुषंगाने मा.संचालक, आरोग्य सेवा तथा मुख्यनिबंधक जन्म-मृत्यू मुंबई यांनी जन्म-मृत्यू घटनांच्या नोंदणी व प्रमाणपत्र वाटपा संदर्भात कामात सुधारणा होण्याच्या दृष्टीने मुद्देनिहाय खालील सूचना निर्गमीत करणेबाबत सूचित केले आहे.

१) राज्यात जन्म-मृत्यू नोंदणी केंद्र शासनाचे जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ व महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम २००० अन्वये करण्यात येते. जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियमातील कलम ७ आणि कलम २१ मधील तरतूदी नुसार संबंधीत निबंधक त्याच्या कार्यक्षेत्रात घडलेल्या प्रत्येक जन्म-मृत्यू व उपजत मृत्यू घटनांची नोंदणी करतात. तसेच अधिनियमातील कलम-१२ मधील तरतूदी

नुसार निबंधकाने नोंदणी करण्याची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर माहिती देणा-यास जन्म-मृत्यू नोंदवहीतील उतारा/प्रमाणपत्र देण्याची त्वरित कार्यवाही करणे बंधनकारक आहे.

२) आपणास माहितच आहे की, जन्म-मृत्यू नोंदणीचा उतारा/प्रमाणपत्र वाटप करणे अधिनियम व नियमातील तरतूदीनुसार बंधनकारक आहे. सध्य परिस्थिती मध्ये नागरीकांना जन्म आणि मृत्यू या घटना नोंदविताना तसेच जन्म व मृत्यू प्रमाणपत्र प्राप्त करुन घेताना अनेक अडचणीना सामोरे जावे लागत असल्याचे दिसून येत आहे. भारत सरकारच्या केंद्रिय कार्यालयास जन्म आणि मृत्यू नोंदणीच्या कार्यप्रणाली मध्ये अनियमितता तसेच भ्रष्ट कार्यप्रणाली अवलंबलेल्या बाबत विविध राज्याकडून अनेक तक्रारी व निवेदने प्राप्त झाली असल्याचे नमूद केले आहे.

३) जन्म व मृत्यू प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी नोंदणी यंत्रणेकडून मोबदला (लाभ) घेतला जातो. अशा प्रकारच्या अनियमित व भ्रष्ट पध्दतीचा अवलंब केल्याबाबतच्या अनेक तक्रारी मा.पंतप्रधानाच्या कार्यालयापर्यंत पोहचल्याचे नमूद केले आहे. मा.पंतप्रधान कार्यालयाने या बाबींची फार गांभिर्याने दखल घेतली आहे. याची नोंद घ्यावी. जन्म-मृत्यू नोंदणी वेळेत तसेच सहज होण्यासाठी नागरीकांच्या सलोख्याने नोंदणी तसेच जन्म-मृत्यू प्रमाणपत्र वाटपातील अनियमितता व भ्रष्ट प्रक्रिया दूर होण्याच्या दृष्टीने खंबीर पावले उचलावीत. जन्म-मृत्यू नोंदणी व प्रमाणपत्र वाटप प्रक्रियेमध्ये सूसूत्रता, नियमितता या बाबी आपल्या जिल्हयात प्रभाविपणे राबवाव्यात. जेणे करुन नागरीकांना होणारा त्रास कमी होईल व कामात सुधारणा होणच्या दृष्टीने खालील मुद्दयांच्या अनुषंगाने प्रभावी कार्यवाही करावी.

अ. जन्म-मृत्यू नोंदणी व प्रमाणपत्र वाटपासाठी भ्रष्ट प्रक्रियेचा अवलंब करणा-या कर्मचा-या विरुध्द प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करावी. आवश्यक भासल्यास कायदेशीर कारवाईचा पर्याय विचारात घ्यावा.

ब. जन्म-मृत्यू नोंदणी व प्रमाणपत्र वाटप प्रक्रियेमध्ये पारदर्शकता ठेवावी. तसेच नोंदणी व प्रमाणपत्र वाटपासाठी (उशिरा नोंदणीसह) विशिष्टकाल मर्यादा निश्चित करावी.

क. जन्म-मृत्यू नोंदणी व प्रमाणपत्र वाटप विभागात काम करणा-या व नागरीकांशी संबंध येणा-या कर्मचा-यांची तीन वर्षापेक्षा जास्त काल त्या पदावर न ठेवता इतर विभागात इतरत्र बदली करावी.

ड. वाजवी कारणाशिवाय तिच्या/त्याच्या कार्यक्षेत्रात घडलेल्या जन्म आणि मृत्यू घटनेची जे निबंधक/उपनिबंधक जन्म-मृत्यू नोंदणी करण्याचे नाकारतील/टाळतील व जन्म-मृत्यू नोंदणीचे मासिक अहवाल विहित नमुन्यात देण्यास नकार देतील अशा निबंधक/उपनिबंधक यांचे विरोधात अधिनियमातील कलम २३(२) अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

उपरोक्त प्रकरणी प्राधान्याने उचित कार्यवाही करावी. या अनुषंगाने आपल्या स्तरावरुन सर्व निबंधकाना सूचना निर्गमीत कराव्यात. जेणेकरुन जन्म-मृत्यू नोंदणी व प्रमाणपत्र वाटपाचे काम सुधारण्यास मदत होईल. आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास अवगत करावा.

सोबत - उपनिबंधक (CRS) नवी-दिल्ली यांचे इंग्रजी पत्र दिनांक २५/०३/२०१५ ची झेरॉक्स प्रत अवलोकनार्थ जोडली आहे.

उपसंचालक आरोग्य सेवा
तथा उपमुख्य निबंधक जन्म-मृत्यु
महाराष्ट्र राज्य पुणे-१

प्रत सादर -

मा.श्री. अ.वि.कदम, अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन, जी.टी.हॉस्पीटल आवार, १० वा मजला, नविन मंत्रालय, मुंबई-१.

मा. संचालक, आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म-मृत्यु, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१.

मा. पी.ए.मिनी, उपमहारजिस्ट्रार, सीआरएस, व्हीएस डिव्हीजन वेस्ट ब्लॉक-१, आर.के.पुरम, नवी-दिल्ली-११००६६.

प्रत - १) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) जिल्हा परिषद, .......... (सर्व)
२) गट विकास अधिकारी तथा अप्पर निबंधक जन्म-मृत्यू, पंचायत समिती......... (सर्व)
३) उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळे .......... (सर्व)

उपसंचालक
आरोग्य सेवा (आ.मा.जी.आ.)
पुणे
दिनांक 13 MAY 2015
जावक क्र. 2602-2721
सही ..........

C:D-83/Circular 2015.in